## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—३०/०७/२०१६.

**१) ट्रॅक्टरची मोटार सायकला धडक, एक जखमी . :—**

दिनांक २५/०७/२०१६ रोजी १९.२० वा. दरम्यान फिर्यादी प्रितम विलास मेश्राम वय २४ वर्ष, रा.नांदोरा हा जखमी आपल्या पल्सर मोटार सायकलने खरबीला जात असता समोरून येणा—या यातील आरोपी अज्ञात ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारून जखमी केले. व अपघाताची सुचना न सांगता पळुन गेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि सहकलम १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत

**२) टाटा सुमो गाडीची मोटार सायकलला धडक दिल्याने दोघांचा मृत्यु . :—**

दिनांक २९/०७/२०१६ रोजी १९.०० ते २२.०० वा. दरम्यान आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपने चालवुन विरुध्द दिशेने येणा—या सिडी डिलक्स मोटार सायकल क्र. एसडब्लु ०३७२ यावर बसुन गावाकडे जात असतांना यांच्या गाडीला बावनथडी राज्य मार्गावर धडक दिली. यातील मृतक १) किसन ऊईके वय २२ वर्ष, व २)शिवकुमार अंदुचंद मंडेलकर वय २२ वर्ष, दोन्ही रा. अर्जुनी टोला दोन्ही इसमांच्या मरणास कारणीभुत झाला.असे फिर्यादी राधेशामजी गेंदलालजी मंडलेकर वय ४२ वर्ष, यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गेडाम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक ३०/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. साकोली, पवनी व तुमसर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३ लिटर ४८० मिली लिटर देशी दारू किमती ९५०/—रु. व तसेच जुगारातुन किमती. ७५०/—रु. असा एकुण कि. १,७०० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

३०|७|१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.